# स्त्री – पुरुष समता : काही निरीक्षणे

प्रा. विजय एस. कांडलकर

सहा. प्राध्यापक संताजी महाविदयालय, नागपूर vijay30kan@gmail.com

**सारांश –**

वर्तमान काळात जागतिक स्तरावर सतत विकासाच्या दृष्टीने लैगिक भेदभाव दूर करण्याच्या दृष्टीने बोलले जात आहे तर दुसरीकडे लैगिक असमानतेची बीजे सामाजिक आणि राजकीय कारणामुळे मजबूत होत असलेली दिसते. या बाबतीत आपणा सर्वाना विचार करायला हवा की, विश्व विकासाचे स्वप्न पूर्ण करण्याकरिता लैगिक समानतेची उंची कश्या पध्दतीने प्राप्त करता येईल, नाही तर लैगिक असमानता ही एक कठीण समस्या होऊन बसेल. समाजाच्या कोणत्याही क्षेत्रात डोकावून बघितले तरी ही समस्या आजही जीवंत असलेली दिसले. या समस्येला वेळीच आवर घातला नाही, तर एक शांतीपूर्ण आणि सुंदर जगताची कल्पना करणे शक्य होणार नाही. जो पर्यत लैगिक समता प्रस्तापित होणार नाही तो पर्यंत २०३० चा एजेंडा पूर्ण करणे शक्य होणार नाही.

आपल्या भारत देशाला विकसित करण्यासाठी भारतीय स्त्रियांचा वाटा मोठाच आहे. राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, झाशीची राणी, कल्पना चावला, आनंदीबाई जोशी अश्या बऱ्याच स्त्रियांची उदाहरणे आपल्याला भारताच्या इतिहासात राज्य करतांना दिसतात असे म्हटले जाते की, राजमाता जिजाऊ नसत्या तर छत्रपती शिवाजी महाराज घडले नसते कारण नवीन स्वराज्याची स्वप्ने पहात असतांना जशी शिकवण राजमाता जिजाऊ यांनी आपल्या पुत्रांना दिली, ज्याप्रमाणे त्यांनी शिवाजी महाराजांना शिकवण दिली त्यामुळेच शिवाजी राजे घडले. त्याच प्रमाणे स्त्री शिक्षणाला चालना देणाऱ्या सावित्रीबाई फुले, भारतातील पहिल्या महिला डॉ. किरण बेदी, झाशीची राणी अजून अशी बरीच उदाहरणे आपल्याला भारताच्या इतिहासात पहायला मिळते. आजच्या स्त्रियांनी अनेक क्षेत्रात आपले नाव पुढे केले असले तरीही भारतात अजूनही काही भागात पुरुष प्रधान समाज आपल्याला वावरताना दिसतात.

जगाच्या तुलनेत भारतात मोठ्या प्रमाणावर स्त्री –भून हत्या केली जाते तसेच त्यांना पुरेसे शिक्षण दिले जात नाही. फार कमी वयात त्यांची लग्न केली जातात तसेच हुंडाबळीला बडी पडणारी स्त्रियांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. आपण ज्या समाजात राहतो त्या समाजाच्या विकासासाठी स्त्री – पुरुष समानता असणे आवश्यक आहे.

संयुक्त राष्ट्र महासभेत उच्च स्तरीय बैठकित सप्टेबर २०१५ मध्ये एक एजेंडा पारित करण्यात आला त्यात २०३० पर्यंत १७ विकास कार्यक्रम उदिष्टे ठरविण्यात आली यात भारताबरोबरच १९३ देशांनी त्याचा स्वीकार केला आणि इतर उदिष्टाबरोबरच लैगिंक समानता या उदिष्ठाचा समावेश करण्यात आला. साहजिकच समाजाच्या विकासाकरिता लैगिंक समानता फार महत्वाची आहे. स्त्री आणि पुरुष हे समाजाचे मूळ आधार आहे आणि समानता हे सुंदर व सुरक्षित समाजाचा असा मार्ग आहे ज्यावर विकास रुपी इमारत उभी राहू शकते. लैगिक समानता यांच्यातील भेदभाव हे जाणून बुजून बनविण्यात आलेली अशी दरी आहे ज्यामध्ये समानतेपर्यंत पोहचण्याचा मार्ग हा कठीण झाला आहे.

आपल्या भारत देशात लिंगावर आधारित भेदभाव मोठ्या प्रमाणावर आहे. जन्मापासून मृत्यूपर्यंत, शिक्षणापासून रोजगारापर्यंत प्रत्येक ठिकाणी लैगिक भेदभाव ( असमानता ) स्पष्टपणे दिसून येते. या असमानतेला कायम ठेवण्यात सामाजिक आणि राजकीय घटकाची भूमिका महत्वाची असल्याची दिसून येतात. वर्ल्ड इकोनोमिक फोरम द्वारे २०१७ मध्ये ग्लोबल जेंडर गँप इंडेक्स वर नजर टाकली असता असे लक्षात येते की, भारत १४४ देशाच्या सूचित १०८ व्या क्रमांकावर आहे. याचाच अर्थ असा की, भारत देशात लैंगिक असमानता किती खोलवर रुजल्या गेली आहे.

त्या दृष्टीने विविध क्षेत्रात लैंगिक असमानता निर्माण झाल्याचे दिसते व पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना कमी लेखल्या जाते. स्त्रियांना आर्थिक,सामाजिक,राजकीय, शेक्षणिक या सर्वच बाबतीत लिंग आधारित भेदभाव पूर्ण वागणूक मिळत असल्याचे दिसून येते. त्यापैकी काही क्षेत्राचा विचार पुढीलप्रमाणे

**रोजगार क्षेत्रात लैंगिक असमानता –**

रोजगार क्षेत्रातील लैंगिक असमानता दूर करण्याच्या दृष्टीने समान वेतन अधिनियम, १९७६ लागू करण्यात आला तरी सुद्धा रोजगार क्षेत्रात लैंगिक असमानता मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येते. मॉनस्टर सँलरी इंडेक्स २०१६ च्या आकड्यावर नजर टाकली असता असे लक्षात येते की, एक सारख्या कार्याकरिता भारतात पुरुषांच्या तुलनेत महिलांना

२५% वेतन कमी दिले जाते. रोजगाराच्या वेगवेगळ्या क्षेत्रात लैंगिक असमानतेच्या आधारावर वेतनामध्ये मोठ्या प्रमाणावर फरक असलेला दिसतो. सूचना आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रापासून तर मनोरंजनाच्या क्षेत्रापर्यंत अनेक ठिकाणी महिलांना मिळणारे वेतनाबद्दल असमानतेचा सामना करावा लागतो तसेच वेतन नाही तर महिलांच्या कामाबद्दल सुद्धा भेदभाव (असमानता) किंवा कमीपणा यांचे आकडे पाहिल्यास याची प्रचीती येते. लिंगावर आधारित होणारे भेदभाव हे संघटीत आणि असंघटीत अशा दोन्ही क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर असलेले दिसून येते.

**मनोरंजनाच्या क्षेत्रात लैंगिक असमानता -**

मनोरंजनाच्या क्षेत्रात सुद्धा लैंगिक असमानता मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्याचे दिसून येते आणि याचा सामना या अभिनेत्रींना करावा लागत आहे. खर तर सिनेमा मध्ये अभिनेत्रीची भूमिका ही मुख्य भूमिका समजली जात नसून अभिनेत्याची भूमिका ही मुख्य भूमिका मानली जाते आणि अभिनेता व अभिनेत्री यांच्या मानधनात सुद्धा तफावत असल्याचे दिसून येते. अभिनेत्री पेक्षा अभिनेत्यांना जास्त मानधन मिळताना दिसते. या समस्येवर बऱ्याच अभिनेत्रींनी नाराजगी सुद्धा व्यक्त केली आहे. या संदर्भात, अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा यांनी सुद्धा स्पष्ट म्हटले की, वर्तमान महिला आपल्या अधिकाराबाबत नाराज आहे. केवळ सिनेमा उद्योगामध्येच बदल करायला पाहिजे असे नाही तर खेळ,व्यापार, किंवा कोणत्याही व्यवसायात महिलांना समान वेतन मिळायला पाहिजे. मनोरंजन क्षेत्राव्यतिरिक्त सुद्धा असे काही क्षेत्र आहे ज्यात महिला असमान वेतनाच्या समस्येबाबत लढा देत आहे.

**कामगार क्षेत्रात लैंगिक असमानता -**

आश्चर्याची गोष्ट अशी की, जिथे कुठे रस्ते निर्माण कार्य सुरु असतात तेथे सावधानीच्या दृष्टीने लिहिले असते की,' Men at Work ' परंतु महत्वाची गोष्ट म्हणजे अशा ठीकानी महिला सुद्धा काम करीत असतात तरी सुद्धा आम्ही महिलांच्या कामाकडे दुर्लक्ष करतांना दिसतो. तसेच या दृष्टीकोनातून विचार केल्यास सिलाइ मशीनवर काम करणाऱ्या महिलाकडे दृष्टीक्षेप टाकल्यास त्यांना सुद्धा कामाच्या प्रमाणात कमी मानधन मिळताना दिसते आणि अशा महिला सुद्धा लैंगिक असमानतेच्या शिकारी झाल्याचे दिसून येतात.

**खेळ क्षेत्रात लैंगिक असमानता -**

ग्रामीण भाग असो की शहरी भाग, कामाच्या व्यवहाराबाबत समाजात भेदभाव बघायला मिळते (असमानता). यात खेळ जगत सुद्धा सुटलेला नाही. खेळ जगतात सुद्धा भेदभाव आहे. खेळात मिळणारी राशी ही पुरुषांच्या तुलनेत महिलांना कमी मिळताना दिसते. मग ते कुस्ती असो वा क्रिकेट, प्रत्येक खेळात असमानतेचे समीकरण बघायला मिळते. या व्यतिरिक्त पुरुषांच्या खेळाचे प्रसारण हे महिलांच्या खेळापेक्षा अधिक होत असतांना दिसते.

**राजकीय क्षेत्रात लैंगिक असमानता –**

वर्तमान काळात या क्षेत्राकडे सुद्धा दुर्लक्ष करून चालणार नाही. आज राजकीय क्षेत्रात सुद्धा लैंगिक असमानता मोठ्या प्रमाणात फोफावत आहे. पुरुषांचा तुलनेत महिलांचे प्रमाण राजकिय क्षेत्रात कमी असल्याचे दिसून येते. लोकसभा असो की विधानसभा यांच्या प्रथम निवडणुकीपासून तर २०१९ च्या निवडणुकीपर्यंतचा विचार केल्यास महिला प्रतिनिधींची संख्या फारच कमी असल्याचे दिसून येते तसेच प्रत्यक्ष निवडून येणाऱ्या महिला प्रतिनिधी तर फारच कमी आहे. वर्तमान काळात २०१९ च्या महाराष्ट्र विधानसभेची ही आकडेवारी बघितल्यास केवळ २४ महिला प्रतिनिधी या निवडणुकीमध्ये निवडून आल्याचे दिसते. त्या तुलनेत महाराष्ट्रात एकूण ८.२४ कोटी जनसंख्येच्या दृष्टीने जवळ जवळ ५० टक्के म्हणजेच ४.१२ कोटी महिला आहेत तरी सुद्धा राजकारणात महिला निवडून येण्याचे प्रमाण हे पुरुषांच्या तुलनेत फारच कमी असल्याचे दिसून येते. ही लैंगिक असमानता या क्षेत्रात निर्माण झाली आहे. स्त्रियांना ५० टक्के आरक्षण प्राप्त असूनही पुरुषांच्या तुलनेत त्या मागे पडत आहे. तरी सुद्धा बरीच राष्ट्रे विकासाचा स्तंभ उभारत असताना लैंगिक समानतेकडे दुर्लक्ष करीत आहे की, त्यादृष्टीने प्रयत्न कमी पडत आहे. या संभ्रमात पडलेली दिसतात.

जागतिक स्तरावर सतत विकासाच्या दृष्टीने भेदभाव दूर करण्याच्या दृष्टीने बोलले जाते तर दुसरीकडे लैंगिक असमानतेची मुळे सामाजिक, आर्थिक व राजकीय कारणांमुळे मजबूत होताना दिसते. या सर्व बाबतीत विचार करायला हवा. जागतिक विकासाचे स्वप्न पूर्ण करण्याकरिता लैंगिक समानतेचे शिखर कश्या पध्दतीने गाठता येईल याचा विचार होणे आवश्यक आहे नाहीतर ही एक जटील समस्या बनेल. लैंगिक समतेशिवाय एक शांतीपूर्ण आणि सुंदर जगाची कल्पना करणे शक्य नाही. जो पर्यन्त कोणत्याही देशाचा पूर्ण विकास झाला किंवा घडून आला असे म्हणता येणार नाही.

लोकशाही व्यवस्थेत लैंगिक समानता आवश्यक आहे. यशस्वी लोकशाहीकरिता सर्वांना समान मानून सर्वांना समान अधिकार प्राप्त होणे आवश्यक आहे. स्त्री व पुरुष यांच्यात लैंगिक दृस्तीकोनातून कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करणे हेच लैगिक समानतेत अभिप्रेत आहे.

**लैगिक समानतेकरिता आवश्यक बाबी –**

१) **आर्थिक तत्व** –मोफत शिक्षण, पुस्तके, स्त्रियांना, मुलींना देणे आवश्यक आहे त्यामुळे आपला अधिकार आणि कतर्व्याबद्दल जागृत होईल यामुळे लैगिक समानता स्थापन करण्यास मदत मिळेल.

२) **समाज दृष्टीकोण** –लैगिक समानतेकरिता समाज दृष्टीकोण यात बदल घडवून आणणे फार महत्वाचे आहे. स्त्री व पुरुषात कोणत्याच प्रकारचा भेदभाव असायला नको. याकरिता समाजात जागृती होणे आवश्यक आहे. उदा. नाटक, पथनाट्य, याद्यारे समाजात लैगिक असमानतेप्रतीचा दृष्टीकोनात बदल घडून येईल.

३) **शेक्षणिक सुविधा** – स्त्री किंवा महिला यांना शेक्षणिक सुविधा मोठ्या प्रमाणावर प्राप्त करून देणे.

४) **प्रशासकीय बाबी** –यात सुद्धा महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग असायला पाहिजे. त्या प्रकारच्या संधी त्यांना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**लैगिक समानतेची आवश्यकता –**

१. लोकशाही करिता लैंगिक समानता आवश्यक आहे. यशस्वी लोकशाही करिता सर्वांना समान मानून सर्वाना समान अधिकार प्राप्त होणे आवश्यक आहे. स्त्री व पुरुष यांच्यात लैंगिक दृष्टीकोनातून कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करणे.

२. चांगला समाज तेव्हाच मानल्या जाईल जेव्हा स्त्री असो व पुरुष यांना समान अधिकार प्राप्त होईल. सर्वाना समोर जाण्याचा अधिकार असेल त्यामुळेच लैंगिक समानता ही चांगल्या समाज निर्मिती करिता योग्य मानली जाते.

३. मानव सुरक्षेकरिता लैंगिक समानता आवश्यक आहे.

४. कोणताही समाज असो वा देश तो आपला विकास तेव्हाच करू शकेल जेव्हा अशा समाजात किंवा देशात लैंगिक समानता प्रस्तापित असेल. स्त्री व पुरुषांना समान समजून बरोबरीचा अधिकार मिळेल.

५. प्रत्येक व्यक्तीला (स्त्री - पुरुष) यांना बरोबरीचा अधिकार मिळेल व स्वतःला सिद्ध करण्याचा अधिकार मिळेल.

६. स्त्रियांमध्ये योग्यता असलेली दिसते परंतु त्यांना ती दाखविण्याची संधी प्राप्त होत नाही. अशी संधी महिलांना प्राप्त झाली तर ती आपली योग्यता सिद्ध करू शकते व समाज आणि देशाचा विकास घडवून आणू शकतो.

७. भारतीय संस्कृतीच्या संरक्षणाकरीता लैंगिक समानता आवश्यक आहे.

**महत्व -**

लैंगिक समानता हा केवळ मानव अधिकारच नाही तर शांतीपूर्ण आणि मजबुत विश्व निर्माण करण्याचा महत्व पूर्ण घटक आहे. महिलांना मुख्य धारा पासून वंचित ठेवणे म्हणजे संम्पूर्ण जनसंख्येच्या प्रमाणात अर्धी लोकसंख्या ही संपन्न समाज आणि अर्थव्यवस्थेच्या निर्माण कार्यापासून त्यांना वंचित ठेवणे होय. शिक्षणात समान संधी, राजकीय आणि आर्थिक निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग हा केवळ महिलांनाच लाभदायक नाही तर संपूर्ण मानवजातीचाच लाभ होय. महिलांच्या सशक्तीकरनामुळे केवळ निरंतर विकासाचे उद्धिष्ट समोर तर जाऊ शकते त्याच बरोबर दारिद्र्य, गरिबी दूर होऊन आर्थिक वृद्धी दर सुद्धा वाढविता येईल.

**संदर्भ –**


१. *भार्गव राजीव, आचार्य अशोक, (संम्पा.), 'पोलीटीकल थिअरी:ऐन इंट्रोडक्शन, पियर्सन लोंगमेन, नई दिल्ली.*
२. *वाडेकर अल्का , 'कुठे आहे स्त्री – पुरुष समानता, उन्मेष प्रकाशन*
३. *रानडे प्रतिभा, 'स्त्री प्रश्नाची चर्चा, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९१*
४. *महोदय बैजनाथ, 'स्त्री और पुरुष, सस्ता साहित्य मंडल, नई दिल्ली*
५. *आपटे, ज. रा.,रोडे पुष्पा, 'भारतातील महिला विकासाची वाटचाल, डायमंड पब्लिकेशन, पुणे,२००८*
६. *दैनिक लोकमत,(२५ ऑक्टोबर २०१९)*
७. *लोकसत्ता online December 18,2*